# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, यशवंत नगर, विरार (प.)

**<u>मा. सर्वसाधारण सभा</u>**

**मा.सर्वसाधारण सभा सूचना क्र. ०९**

**(सुधारित)**

**दि.१२/०६/२०२६**

प्रति,
मा. श्री / श्रीमती ........................................,
नगरसेवक / नगरसेविका,
वसई-विरार शहर महानगरपालिका

महोदय / महोदया,

या सूचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेची मा.सर्वसाधारण सभा सोमवार, दि.२२/०६/२०२६ रोजी दुपारी ०३:०० वाजता 'सर्वसाधारण सभागृह', ४ था मजला, वसई-विरार शहर महानगरपालिका, मुख्यालय, यशवंत नगर, विरार (प.) येथे खालील विषयांवर विचार विनिमय करून निर्णय घेणेसाठी आयोजित करण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेस कृपया उपस्थित रहावे, हि विनंती.

**<u>मा.सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका</u>**

१. मागील दि.२२/०५/२०२६ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेचे कायम केलेले इतिवृत्त माहितीस्तव.
२. प्रश्नोत्तरे.
३. शासकीय पत्र व्यवहार माहितीस्तव.
४. श्री.जयेंद्र नारायण पाटील, सफाई कामगार यांच्या स्वेच्छा सेवानिवृत्तीबाबत.
५. श्री. हरिदास जयराम म्हात्रे, सफाई कामगार यांच्या स्वेच्छा सेवा निवृत्तीबाबत.
६. कु. जुहिली विनोद सातघरे यांना लाड समिती शिफारसी नुसार महानगरपालिका सेवेत 'लिपिक टंकलेखक' या पदावर सामावून घेणेबाबत.
७. महानगरपालिका कार्यक्षेत्रातील रहदारी व वाहतुक नियंत्रणाकरीता बसविणेत आलेल्या सिग्नल यंत्रणांची १ (एक) वर्षाकरिता साहित्यासह देखभाल दुरुस्ती करणेकामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.
८. सन २०२५-२६ ह्या वर्षात जिल्हा वार्षिक योजना नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत कामांना प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.
९. सन २०२६ ते २०२७ या वित्तिय वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिकेसाठी सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांचे कडील २०७ पैकी १५७ सुरक्षा रक्षकांची पुर्ननियुक्ती करणेकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.
१०. वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (जी) कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. १०५ मध्ये नायगाव पूर्व जुचंद्र येथील नायगाव बापाणे रस्त्यावर ५ ठिकाणी बॉक्स कल्वर्ट बांधणे या कामास सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.
११. जनगणणा-२०२७ च्या कामकाजाकरिता खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजूरी मिळणेबाबत.

१२.सन २०२६-२७, सन २०२७-२८ व सन २०२८-२९ या त्रैवार्षीक वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात "शहर सौदर्याकरण व स्वच्छता स्पर्धा २०२२" अंतर्गत शहर सौदर्याकरण करण्यात आलेल्या मध्यवर्ती चौक, शिल्पे, कारंजे, वारसा स्थळे, GVP इ. यांची दैनंदिन दुरुस्ती करणेकामी प्रशासकिय व वित्तीय मान्यता देऊन ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे बी-२ निविदा दर मागविणेबाबत.

१३.सन २०२६-२७, सन २०२७-२८ व सन २०२८-२९ ह्या त्रैवार्षिक वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या बांधकाम, विद्युत व पाणीपुरवठा विभागामार्फत तसेच मनपाच्या पॅनलवरील तांत्रिक सल्लागारामार्फत तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकाचे शासकिय संस्थेमार्फत, खाजगी कंन्स्लटंट, इंजिनिअर्स ह्यांचेमार्फत तांत्रिक लेखापरिक्षण करुन, प्रमाणित करुन तपासणी अहवाल सादर करणेकामी प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

१४.केंद्र पुरस्कृत Urban Challenge Fund अंतर्गत Public Private Partnership (PPP) तत्त्वावर दोन प्रकल्प राबविण्यासाठी स्वारस्य अभिरुची (EOI) मागविण्यास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

१५.वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील नायगांव कोळीवाडा येथे जलकुंभ बांधणे कामी तयार केलेल्या अंदाजपत्रकीय खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

१६.वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभागसमिती 'एच' कार्यक्षेत्रातील अंबाडी रोड दिवाणमान येथील स्विमींग पुलमध्ये विविध दुरुस्ती करणेकामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

१७.महानगरपालिकेच्या विविध तदर्थ समित्यांवर उपसभापती पदी निवड होणाऱ्या पदाधिकारी यांना वाहन भत्ता मंजूर करणेबाबत.

१८.वसई-विरार शहर महानगरपलिका कार्यक्षेत्रातील ज्येष्ठ नागरीक संघाना वार्षिक अनुदान देणेबाबतच्या धोरणास/योजनेस मान्यता मिळणेबाबत.

१९.वसई-विरार शहर महानगरपालिका राबवित असलेल्या विविध सामाजिक / सांस्कृतीक कार्यक्रमाकरीता १ एप्रिल ते ऑगस्ट २०२६ पर्यंत कार्यरत कंत्राटदारास मुदतवाढ तथा प्रलंबित देयके व माहे एप्रिल ते ऑगस्ट २०२६ पर्यंत नियोजित कार्यक्रमाकरीता सुधारीत प्रशासकीय / वित्तीय मान्यता तसेच वसई-विरार शहर महानगरपालिका राबवित असलेल्या विविध सामाजिक / सांस्कृतीक कार्यक्रमाकरीता सन २०२६-२७ ते सन २०२७-२८ करीता प्रशासकीय / वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

२०.सन २०२६-२७ या वित्तीय वर्षात महानगरपालिका हद्दीतील सर्व भाषिक शाळेतील (इंग्रजी माध्यम वगळून) शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता महानगरपालिका परिवहन सेवेचा वार्षिक मोफत पास योजनेकरिता महिला व बालकल्याण विभागामार्फत ५० % वित्तीय सहाय्य एस.एन.एन सर्व्हिसेस यांस अदा करणे व याकरिता येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

२१.भूमी अभिलेख कार्यालयाकरिता एक वर्षासाठी महानगरपालिकेचे बोळींज येथील जुने प्रभाग समिती कार्यालयाचा पहिला व दुसरा मजला कार्यालयीन कामाजासाठी भाडे तत्वावर देणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२२.वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील फेरीवाल्यांकडून वसूल करणेत येणाऱ्या बाजार फी बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

आपला विशासू,

(विश्वनाथ तळेकर)
महानगरपालिका सचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका

(मा.महापौर महोदय यांच्या मान्यतेने)